# Module :1

# भारतीय ज्ञान प्रणाली

## (Indian Knowledge System)


१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

- १.३.१ भारतीय ज्ञान प्रणाली- संकल्पना, स्वरूप, व्याप्ती,गरज आणि महत्व
- १.३.२ चार वेदांची ओळख आणि वैदिक जीवनाची वैशिष्टये
- १.३.३ भारतीय तत्वज्ञान प्रणाली- पुराण, इतिहास आणि सुभाषिते
- १.३.४ वारकरी संप्रदाय आणि वारी

१.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


---

**१.१ उद्दिष्टे (Objectives):**

सदर स्वयंघटक पूर्ण अभ्यासल्यावर आपल्याला

१. भारतीय ज्ञान प्रणाली म्हणजे काय आणि त्याची गरज लक्षात येईल.
२. चार वेद,त्यांचे स्वरूप, वैदिक कालीन जीवन यांची ओळख होईल.
३. भारतीय तत्वज्ञान प्रणालीतील पुराणे, सुभाषिते - त्यांचे स्वरूप, महत्व यांचे ज्ञान होईल.
४. वारकरी संप्रदाय आणि वारी – स्वरूप, उद्देश, महत्व याची जाण होईल.

---

## १.२ प्रास्ताविक

*"यत्र विश्वम् भवति एक नीडम्।"* अर्थात जेथे संपूर्ण जग हे एका घरट्याप्रमाणे आहे- आपण सर्व एक आहोत असा महान संदेश देणारी, केवळ मानवालाच नाही तर प्रत्येक सजीवाला महत्वाचे स्थान देणारी अशी ही भारतीय संस्कृती. प्राचीन भारतीय ज्ञान ही मानवतेच्या सर्वात जुन्या आणि समृद्ध परंपरांपैकी एक आहे. वेद, उपनिषदे, पुराणे आणि इतर ग्रंथांतून विज्ञान, तत्त्वज्ञान, गणित, आयुर्वेद, योग यासारख्या अनेक विषयांचे सखोल ज्ञान मांडलेले आहे. आर्यभट्ट, चरक, पतंजली यांसारख्या विद्वानांनी विश्वाला महत्त्वपूर्ण योगदान दिले. भारताच्या या ज्ञानाची विशेषता म्हणजे त्याचे आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाने समाजाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे विचार. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीने समग्र मानव विकासावर भर दिला. आजही या ज्ञानाचा वापर आधुनिक काळात प्रेरणा व मार्गदर्शन म्हणून केला जात आहे. या महान संस्कृतीला प्राथमिक स्वरूपात का होईना जाणून घेण्यास मदत करणे हा या स्वयं घटकाचा उद्देश आहे.

## १.३ विषय विवेचन

१.३.१ भारतीय ज्ञान प्रणाली- संकल्पना, स्वरूप, व्याप्ती,गरज आणि महत्व

### अ. भारतीय ज्ञान प्रणाली- संकल्पना

भारतीय ज्ञान प्रणाली ही जगातील सर्वात प्राचीन आणि व्यापक ज्ञान परंपरांपैकी एक मानली जाते. या प्रणालीत मानवाच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व दिले गेले आहे. वेद, उपनिषदे, धर्मशास्त्र, आयुर्वेद, योग, वास्तुशास्त्र, आणि नाट्यशास्त्र या शाखांमध्ये ज्ञानाचे विविध पैलू स्पष्टपणे मांडलेले आहेत.


भारतीय ज्ञान प्रणालीचा गाभा म्हणजे विज्ञान आणि अध्यात्म यांचा समन्वय. प्राचीन काळात विज्ञान, गणित, खगोलशास्त्र, औषधशास्त्र यांसारख्या शास्त्रांच्या विकासात भारतीय विद्वानांचे योगदान मोठे आहे. उदाहरणार्थ, आर्यभट्ट यांनी खगोलशास्त्रात केलेले कार्य किंवा चरक आणि सुश्रुत यांनी आयुर्वेदातील आरोग्यशास्त्राच्या माध्यमातून दिलेले योगदान.

भारतीय ज्ञान प्रणाली केवळ बौद्धिक आणि वैज्ञानिक क्षेत्रांमध्येच महत्त्वाची नाही, तर ती नैतिकता, समाजशास्त्र, आणि सांस्कृतिक मूल्यांनाही समान महत्त्व देते. योग आणि ध्यान यांच्या माध्यमातून शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा समतोल राखण्यावरही भर दिला जातो. या प्रणालीने मानवजातीला सर्वांगीण विकासाचा मार्ग दाखवला आहे, ज्यात शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक विकास होतो.

आजच्या आधुनिक काळातही भारतीय ज्ञान प्रणालीतील तत्त्वज्ञान आणि शास्त्रांवर आधारित अभ्यासक्रम, संशोधन, आणि विचारमंथन सुरू आहेत. यामुळे, विशेषतः ताणतणाव, नैतिकता, आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्राचीन भारतीय ज्ञानाचा उपयोग आणि महत्व वाढत चालले आहे.

### ब. भारतीय ज्ञान प्रणाली- स्वरूप

भारतीय ज्ञान परंपरा म्हणजे एक जटिल, विस्तृत आणि गहन ज्ञानसमूह आहे. ही परंपरा विविध प्रकारच्या तत्त्वज्ञान, साहित्य, विज्ञान, धर्म, योग, आयुर्वेद, ज्योतिष, गणित, स्थापत्यकला आणि आध्यात्मिक तत्त्वज्ञान यांचा समावेश करते. भारतीय परंपरेमध्ये ज्ञानाचे वर्गीकरण "अपरा विद्या" आणि "परा विद्या" असे केले जाते.




आकृती १.१. विद्येचे प्रकार

१. **अपरा विद्या** : अपरा विद्या म्हणजे **भौतिक ज्ञान** किंवा लौकिक विद्या. यामध्ये वेद, विज्ञान, गणित, तर्कशास्त्र, व्याकरण, आणि इतर भौतिकशास्त्रांचा समावेश होतो. हे ज्ञान जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले, परंतु अंतिम सत्याच्या शोधासाठी अपूर्ण मानले जाते. अपरा विद्या जीवनाच्या व्यवहारिक अंगांना समजून घेण्यास मदत करते, परंतु आत्म्याचे सत्य समजून घेण्यासाठी पुरेसे नाही, असे तत्त्वज्ञान सांगते.

२. **परा विद्या**: परा विद्या म्हणजे **आध्यात्मिक ज्ञान**. हे ज्ञान आत्म्याशी संबंधित असते, ज्याद्वारे अंतिम सत्य, आत्मज्ञान, आणि ब्रह्मज्ञान प्राप्त होते. परा विद्या हा मनुष्याच्या अस्तित्वाचा अंतिम उद्देश शोधण्याचा मार्ग आहे. या ज्ञानाद्वारे व्यक्ती जीवनाच्या अंतिम सत्याचा शोध घेते आणि मोक्ष किंवा आत्मसाक्षात्कार साध्य करण्याचा प्रयत्न करते. उपनिषदांमध्ये याचे वर्णन "ब्रह्मविद्या" असेही केले जाते. यामध्ये आत्म्याचे, परमेश्वराचे, आणि जीवन-मरणाच्या चक्राचे गूढ उकलले जाते.भारतीय ज्ञान परंपरेचे स्वरूप तत्त्वज्ञानीक, अध्यात्मिक, आणि व्यावहारिक अशा सर्व स्तरांवर पसरलेले आहे.

भारतीय ज्ञान परंपरेतील तत्त्वज्ञान केवळ मानवाच्या शरीर आणि मनाच्याच नव्हे, तर त्याच्या आत्म्याच्या विकासावरही लक्ष केंद्रित करते. योग, ध्यान, आयुर्वेद, तत्त्वज्ञान आणि वेदांचा अभ्यास या सर्वांचा एकत्रित विचार भारतीय ज्ञान परंपरेचा मुख्य आधार आहे.

### क. भारतीय ज्ञान प्रणाली- व्याप्ती

भारतीय ज्ञान परंपरा अत्यंत व्यापक आणि सर्वसमावेशक आहे. प्राचीन काळापासून विविध ज्ञान शाखांचा विकास होऊन, त्या ज्ञानाने जगाला वैज्ञानिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक, आणि तांत्रिक मार्गदर्शन दिले आहे. भारतीय ज्ञान परंपरेची व्यापक क्षेत्रे प्राथमिक स्वरूपात खालीलप्रमाणे आहेत :

१. विज्ञान आणि तंत्रज्ञान:

भारतीय खगोलशास्त्र, गणित, आणि भौतिकशास्त्र या क्षेत्रांमध्ये मोठे योगदान आहे. आर्यभट्ट, भास्कराचार्य, आणि ब्रह्मगुप्त यांसारख्या गणितज्ञांनी शून्य, दशमान पद्धत, त्रिकोणमिती यांसारख्या महत्त्वपूर्ण शोधांची मांडणी केली.

२. आयुर्वेद आणि वैद्यकशास्त्र:

आयुर्वेद ही जगातील सर्वात जुनी वैद्यकशास्त्र प्रणाली आहे, जी शरीर, मन, आणि आत्म्याचा समतोल राखण्यावर भर देते. चरक आणि सुश्रुत यांसारख्या ऋषी-वैद्यांनी औषधी वनस्पतींचा वापर आणि शल्यचिकित्सेचा विकास केला.

३. योग आणि ध्यान:

योग आणि ध्यान ही भारतीय ज्ञान परंपरेतील महत्त्वाची तत्त्वे आहेत. पतंजलींनी मांडलेल्या योगसूत्रांतून शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा समतोल साधण्याचे मार्गदर्शन मिळते, जे आज जगभर प्रसिद्ध झाले आहे.

४. तत्त्वज्ञान आणि धर्म:

भारतीय तत्त्वज्ञानात वेदांत, उपनिषद, भागवद्गीता, आणि धर्मशास्त्र यांसारखे ग्रंथ मोलाचे योगदान देतात. कर्म, धर्म, मोक्ष, आणि पुनर्जन्म यांसारख्या संकल्पना मानव जीवनाच्या नैतिक व आध्यात्मिक विकासाला मार्गदर्शन करतात.

५. कला आणि संगीत:

नाट्यशास्त्र, संगीत, आणि नृत्य या भारतीय कलाशाखा प्राचीन काळापासून विकसित झालेल्या आहेत. भारतीय शास्त्रीय संगीत आणि नृत्य परंपरा जगभरातील सांस्कृतिक विरासत समृद्ध करते.

६. भूगोल आणि वास्तुशास्त्र:

भारतीय भूगोल शास्त्र आणि वास्तुशास्त्र हे वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित होते. वास्तुशास्त्राने इमारती, घर, मंदिरांची रचना आणि परिसराशी असलेली सुसंगती यावर मार्गदर्शन केले.

७. नीतीशास्त्र आणि राजकारण:

कौटिल्याचे अर्थशास्त्र आणि राजधर्म यावर आधारित विचारधारा भारतीय प्रशासन आणि राजकीय तत्त्वज्ञानाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत.

८. सामाजिक विज्ञान:

भारतीय समाजशास्त्र आणि मनोविज्ञान हे नैतिकता, आदर्श, आणि जीवन जगण्याच्या विविध पद्धतींचे विवेचन करते. समाजातील विविध जाती, वर्ग, आणि परंपरांचा अभ्यास भारतीय ज्ञान परंपरेत केला जातो.

९. पर्यावरण आणि निसर्ग:

भारतीय ज्ञान प्रणाली निसर्गाशी सुसंगत जीवनशैलीला महत्त्व देते. पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक साधनांचा वापर, आणि पंचमहाभूतांचे संतुलन राखण्याचे विचार यातून मांडले गेले आहेत.

या सर्व ज्ञान शाखांनी भारतीय ज्ञान प्रणालीला व्यापक बनवले आहे, ज्याचा प्रभाव आधुनिक काळातही दिसून येतो.

## ड. भारतीय ज्ञान प्रणाली- गरज

आजच्या युगात, जेव्हा विज्ञान, तंत्रज्ञान, आणि औद्योगिकीकरणाने आपली जीवनशैली पूर्णपणे बदलली आहे, तेव्हा भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. आधुनिक जीवनात ताण-तणाव,

मानसिक असंतुलन, आणि नैतिक अधोगतीच्या समस्या वाढत आहेत. यामुळे भारतीय ज्ञान परंपरेची गरज अधोरेखित होते

१. स्वास्थ्य आणि संतुलन:

आयुर्वेद आणि योगाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्याचे संतुलन साधले जाऊ शकते. आयुर्वेदाच्या आहार-विहार पद्धती आजही आधुनिक वैद्यकशास्त्राला पूरक ठरतात.

२.आध्यात्मिक उन्नती:

भारतीय ज्ञान परंपरेतील ध्यान, योग, आणि वेदांचे अध्ययन आत्मज्ञान आणि अध्यात्मिक शांती प्रदान करतात. आधुनिक जीवनातील अस्थिरता आणि असंतोष यावर मात करण्यासाठी भारतीय तत्त्वज्ञान आणि ध्यान पद्धती महत्त्वपूर्ण आहेत.

३.नैतिक मूल्यांची गरज:

भारतीय तत्त्वज्ञान जीवनातील नैतिक मूल्यांना अधोरेखित करते. सत्य, अहिंसा, करुणा आणि संयम यांसारख्या मूल्यांवर आधारित जीवनाची आवश्यकता आहे, जी भारतीय ज्ञान परंपरेतून शिकायला मिळते.

४. पर्यावरण आणि शाश्वतता:

भारतीय परंपरा नेहमीच निसर्गाशी सुसंगत राहिली आहे. "वसुधैव कुटुंबकम्" आणि "सर्वे भद्राणि पश्यन्तु" यांसारख्या तत्त्वज्ञानांनी मानव आणि निसर्ग यांच्यातील संबंध सुधारण्याचे महत्त्व सांगितले आहे. पर्यावरण रक्षणाच्या आजच्या काळात या विचारांची गरज प्रकर्षाने जाणवते.

## ई. भारतीय ज्ञान प्रणाली- महत्व

भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व अनेक पातळ्यांवर अधोरेखित होते:

१. वैज्ञानिक दृष्टिकोन:

भारतीय ज्ञान परंपरेने वैज्ञानिक दृष्टिकोनाला सदैव प्रोत्साहन दिले आहे. आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, स्थापत्यशास्त्र या क्षेत्रांमध्ये भारतीय विद्वानांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

२ . मानवता आणि करुणा:

भारतीय तत्त्वज्ञान मानवतेवर आधारित आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, महात्मा गांधी यांसारख्या महान व्यक्तींनी भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रचार केला आहे, ज्यातून करुणा, सेवा आणि समानता यांचे महत्त्व स्पष्ट होते.

३. सांस्कृतिक वारसा:

भारतीय ज्ञान परंपरेने भारतीय संस्कृतीला एक ठोस आधार दिला आहे. शास्त्रीय संगीत, नृत्य, काव्य, आणि चित्रकला यांसारख्या कलात्मक परंपरांचे महत्त्व भारतीय ज्ञान परंपरेने वाढवले आहे.

४.अध्यात्मिक मार्गदर्शन:

भारतीय ज्ञान परंपरेतून प्राप्त होणारे अध्यात्मिक मार्गदर्शन जीवनातील विविध समस्यांचे निराकरण करण्यात मदत करते. ध्यान, योग, आणि वेदांचे अध्ययन आत्मसाक्षात्कार आणि शांती प्राप्त करण्याचे मार्ग आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -१**

**खालील विधाने चूक किंवा बरोबर ते पुढे दिलेल्या कंसात लिहा.**

१. भारतीय ज्ञान प्रणालीला केवळ विज्ञान आणि तत्त्वज्ञानाचे ज्ञानच महत्त्वाचे मानले जाते.
२. परा विद्या आत्मा आणि ब्रह्मज्ञानाच्या गूढांचा अभ्यास करते.
३. ऋग्वेद यज्ञांसाठी मंत्र प्रदान करतो आणि या मंत्रांचा उपयोग यज्ञसंस्थेत केला जातो.
४. वेदांचा अभ्यास आधुनिक जीवनात फक्त शास्त्रीय संगीताच्या विकासासाठी महत्त्वाचा आहे.
५. भारतीय ज्ञान प्रणालीने विज्ञानाच्या क्षेत्रात भौतिकशास्त्रात योगदान दिले आहे.
६. वेदांत हा भारतीय तत्त्वज्ञानाचा एक भाग आहे आणि तो वेदांचा एक स्वतंत्र ग्रंथ आहे.
७. आयुर्वेद केवळ शारीरिक आरोग्यासाठीच महत्त्वपूर्ण आहे, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्यासाठी नाही.
८. वेदांमध्ये यज्ञांसाठी कर्मकांडांचे नियम आणि विधी तपशीलवार वर्णित केलेले आहेत.
९. भारतीय ज्ञान प्रणालीतील निसर्ग आणि पर्यावरणाशी सुसंगत जीवनशैलीने आजच्या काळात महत्त्व कमी केले आहे.

### १.३.२.१ चार वेदांची ओळख आणि वैदिक जीवनाची वैशिष्ट्ये:

### अ. चार वेदांची ओळख-


वेद हे भारतीय धर्माचे व संस्कृतीचे मूलाधार ग्रंथ आहेत. वेद शब्द ज्ञानार्थक विद् (अर्थ-जाणणे) या मुळ धातुपासून बनला आहे . याचा अर्थ आहे ज्ञान. म्हणून वेद शब्दाचा अर्थ आहे ज्ञानाची राशी किंवा ज्ञानाचा संग्रह-ग्रंथ.

ऋकप्रतिशाख्य मध्ये वेदाची व्याख्या विष्णूमित्र यांने खालीलप्रमाणे दिली आहे

विद्यन्ते ज्ञायन्ते लभ्यन्ते एभिर्धर्मादि -पुरुषार्था: इति वेदा:।

अर्थात वेद शब्दाचा भावार्थ आहे –ज्या ग्रंथांद्वारे धर्म, अर्थ, काम, मोक्षरूपी चार पुरुषार्थाचे विवेचन केले गेले आहे, ज्यामध्ये या चार पुरुषार्थाच्या अस्तित्वाचा बोध होतो, त्यांचे ज्ञान होते,त्यांची प्राप्ती होते अशाप्रकारे सर्वांगीण विवेचन करणारा ग्रंथ म्हणजे वेद होय. याच्या अनेक व्याख्या कैक भाष्यकारांनी केल्या आहेत.

वेदचतुष्टय अर्थात वेद चार आहेत.




आकृती १.२ चार वेद

**१. ऋग्वेद:**

हा चार वेदांपैकी एक असून त्याची रचना चार वेदांमध्ये सर्वप्रथम झाली आहे असे समजण्यात येते. हा प्राचीन भारतीय वैदिक संस्कृतीतील सर्वात जुना आणि पवित्र समजला जाणारा ग्रंथ आहे. ऋग्वेद म्हणजे ऋचां वेदः अर्थात् ऋचारूपी ज्ञानसंग्रह. ऋक् म्हणजे ऋच्यन्ते स्तूयन्ते देवाः यया सा ऋक् l छन्दोबद्ध स्वरूपात जिच्यामध्ये देवांची स्तुती केली जाते ती ऋक्. वृत्तबद्ध मंत्र असाही ऋचेचा अर्थ आहे. बोली भाषेत समजावयाचे झाले तर विशिष्ट अशा काव्यरचना. या विश्वाची, त्यातील विविध शक्तींची जी रूपे त्यांनाच देव मानून त्यांना समजून घेण्यासाठी व प्रसन्न करून घेण्यासाठी त्यांची आळवणी वैदिक ऋषींनी ज्या स्वरूपांत केली, त्या रचनेला ऋचा असे म्हणता येईल. ही रचना करताना त्यांची प्रतिभा फुलून येत असे. अशा सर्व रचनांचा संग्रह म्हणजे ऋग्वेद. अखिल मानवजातीचा आद्य साहित्यिक उद्गार असेहि ऋग्वेदाला म्हणता येईल.

भारतात प्राचीन काळी यज्ञसंस्था फार मोठ्या प्रमाणावर प्रसृत झाली होती. यज्ञांचे अनेक प्रकार होते व ते करण्याचे विशिष्ट विधी तयार झाले होते. विशिष्ट विधी व त्यातील हवन करतेवेळी ऋग्वेदातील विशिष्ट देवतांची सूक्ते म्हणण्याचे शास्त्र तयार झाले होते. हे सर्व विधी यथाशास्त्र झाले तरच यज्ञाची फलप्राप्ति होणार, अशी त्यांची श्रद्धा होती. हे सर्व तपशीलवार स्पष्ट करणारे अनेक ग्रंथही तयार झाले होते. त्यांना 'ब्राह्मण' अशी संज्ञा होती. म्हणून या दोन्हीला मिळून 'वेद' ही संज्ञा प्राप्त झाली. म्हणूनच सूत्रग्रंथात 'मंत्रब्राह्मणयोर्वेदनामधेयम्' अशी व्याख्या दिलेली आहे. ऋचा म्हणजे मंत्र व त्यांचे गद्यातील अधिकारी ऋषींनी केलेले स्पष्टीकरण म्हणजे ब्राह्मण. अनेक ऋचा मिळून सूक्त बनते.

ऋग्वेदाची एकूण सूक्तसंख्या १०२८ आहे. त्यात १०५८० ऋचा आहेत, १५३८२६ शब्द आहेत व अक्षरसंख्या ४,३२००० इतकी आहे. ही सर्व सूक्ते १० मंडळांत विभागली आहेत.
या व्याप्तीवरून याचे भव्यत्व निदर्शनास येते.

आपण जर पूर्वी दूरदर्शन वर लागणारी भारत एक खोज हि मालिका पहिली असेल तर त्याचे शीर्षक गीत- पृथ्वीसे पेहेले .... हे याच वेदातल्या नासदीय सूक्ताचे गाण्यात रुपांतर होते.

२. **यजुर्वेद:**

चार वेदांपैकी हा दुसरा वेद आहे. यजुर्वेद या शब्दाचा अर्थ (संस्कृत:- यजुस् + वेदः = यजुर्वेदः) असा होतो. यामध्ये यज् (मराठी अर्थ यज्ञ याग)हा संस्कृत धातू आहे. यजुर्वेद संहितेत वैदिक काळातील यज्ञात आहुती देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मंत्रांचा समावेश आहे. यज्ञप्रक्रिया आणि यज्ञानुष्ठानातील क्रम लक्षात घेऊनच या वेदाचे संकलन केले असल्याने या वेदाच्या संहितांना 'याज्ञिकी संहिता' असे म्हणतात.

प्राचीन काळी यजुर्वेदाच्या एकूण १०१ शाखा होत्या. यजुर्वेदाच्या प्राथमिक अशा दोन संहिता आहेत - शुक्ल संहिता व कृष्ण संहिता.दोहोंमध्येही धार्मिक अनुष्ठान करावयासाठीचे मंत्र आहेत. कृष्ण यजुर्वेदाच्या संहितेतच ब्राह्मणग्रंथातील गद्य भाग दिले आहेत, तर शुक्ल यजुर्वेदासाठी ते शतपथ ब्राह्मणात स्वतंत्रपणे दिले आहेत. शतपथ ब्राह्मण हा शुक्ल यजुर्वेदाचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ होय. याज्ञवल्क्यशिक्षा हा ग्रंथ या वेदाच्या पठणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

आपल्या देनंदिन जीवनात ऐकला , म्हटला जाणारा

*ॐ भूर्भुवः स्वः*
*तत्स॑वि॒तुर्वरे॑ण्यं*
*भर्गो॑ दे॒वस्य॑ धीमहि।*
*धियो॒ यो नः॑ प्रचो॒दया॑त्॥*

हा गायत्री मंत्र यजुर्वेदातीलच आहे . (अध्याय ३६, मंत्र ३) शिवाय यामध्ये अनेक सुंदर प्रार्थना मंत्र आहेत.

३. **सामवेद:**

हा प्राचीन संस्कृतीतील चार वेदांपैकी तिसऱ्या क्रमांकाचा वेद आहे. साम म्हणजे 'गायन' आणि वेद म्हणजे 'ज्ञान' होय. साम हा शब्द सा ( ऋचा) + अम् ( आलाप) असा तयार होतो. वेदातील ज्या ऋचांवर आलाप घ्यायचा किंवा गायन करायचे त्यांचा संग्रह म्हणजे सामवेद असेही म्हणता येईल. सामवेदात ऋग्वेदातील ऋचांचे गायन कसे करावे याचे विवेचन आहे. सामवेदाला भारतीय संगीताचा पाया म्हणले जाते.

सामवेदाचे दोन प्रधान भाग आहेत - आर्चिक आणि गान. आर्चिकचा शब्दशः अर्थ आहे - ऋक् समूह, ज्याचे दोन भाग आहेत - पूर्वार्चिक आणि उत्तरार्चिक. पूर्वार्चिक मध्ये ६ प्रपाठक किंवा अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायात अनेक खंड आहेत, ज्यांना 'दशति' असेही म्हटले जाते. 'दशति' शब्दावरून असे वाटते की, यामध्ये ऋचांचा संख्या दहा असावी; परंतु काही खंडांमध्ये ही संख्या दहाच्या कमी किंवा दहाच्या अधिक आहे. या खंडांमध्ये मंत्रांचे संकलन छंद आणि देवतेच्या एकतेवर आधारित आहे. पूर्वार्चिकमधील मंत्रांची संख्या ६५० आहे तर उत्तरार्चिकमधील सर्व मंत्रांची एकूण संख्या बाराशे पंचवीस (१२२५) आहे. त्यामुळे दोन्ही आर्चिकांची एकत्रित मंत्र संख्या अठाराशे पन्नास (१८७५) आहे.

या ऋचांचे गायन-सामगान हे सुचवलेल्या विशिष्ट सुरांमध्ये गायले जाते.भगवद्गीतेतील विभूति योगात श्रीकृष्णाने वेदानां सामवेदोऽस्मि I अर्थात मी वेदांमध्ये सामवेद आहे असे म्हणले आहे, हा सामवेदाचा गौरवच आहे. या सर्वावरून गायनकला किती समृद्ध होती याचा अंदाज येतो. संगीत सम्राट

तानसेन (१९६२) या चित्रपटातील सप्त सुरन तीन ग्राम या गाण्यातील स्वर्मान्दालाचे वर्णन हे सामवेदातील स्वरमंडलाचे नारदीय शिक्षेत आलेले वर्णन आहे.

**४.अथर्ववेद:**

चार वेदांपैकी हा शेवटचा वेद. ह्यातील बहुसंख्य मंत्रांचा साक्षात्कार 'अथर्वन्' नावाच्या ऋषींना झाल्यामुळे ह्या वेदास अथर्ववेद हे नाव प्राप्त झाले. अथर्ववेद हा वेदच नाही असा एक विचारप्रवाह आहे कारण यामध्ये वर्णिलेले अनेक विषय जसे यातू विद्या किंवा अभिचार मंत्र हे वैदिक धर्म, परंपरा किंवा संस्कारांचा भाग नाहीत. यासाठी अनेक ठिकाणी वेदत्रयी असा उल्लेख आढळतो.
परंतु उपरोक्त कारणांनी बाजूला केला गेलेला अथर्ववेद वास्तविक तत्कालीन समाजशास्त्राच्या अध्ययनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. समाजोपयोगी अनेक शास्त्रांचा यामध्ये समावेश आहे.

'अथर्' म्हणजे ज्वाला - अग्नी आणि 'अथर्वन्' म्हणजे अग्निपूजक. प्राचीन काळी अग्निहोत्री पुरोहित 'अथर्वन्' या नावाने ओळखला जाई. अथर्ववेदालाच अथर्वाङ्गिरसवेद, भृग्वङ्गिरसवेद, ब्रह्मवेद, क्षत्रवेद, भैषज्वेद असेही म्हणतात. एकाच वेदाची इतकी नावे येण्याचे प्रमुख कारण म्हणजे वेदात अंतर्भूत असलेले विषय वैविध्य. अगदी आयुर्वेदाचे मूळ हि या वेदात आहे असे म्हटले जाते.

अथर्ववेदाच्या विविध नऊ शाखांपैकी सध्या पैप्पलाद आणि शौनक या दोनच संहिता उपलब्ध आहेत. शौनकसंहितेत २० कांडे असून ३४ प्रपाठक, १११ अनुवाक, ७७३ वर्ग, ७६० सूक्ते, ६००० मंत्र, ७३८२६ शब्द आहेत.

उपेक्षित अशा या वेदामध्ये भैषज्यकर्मे, आयुष्यकर्मे, अभिचार किंवा कृत्याप्रतिहरणकर्मे, स्त्रीकर्मे, सांमनस्यकर्मे, राजकर्मे, ब्राह्मणमाहात्म्य, पौष्टिककर्मे, शांतिकर्मे, विश्वोत्पत्ती आणि अध्यात्म या विषयांवरील सूक्ते आहेत. अथर्ववेदातील विषयांचे वैविध्य पाहता त्यात मानवी संबंध आणि भावभावना यांचा वैविध्यपूर्ण प्रत्यय येतो. वैदिक आर्यांच्या सर्वसामान्य जीवनाचे प्रतिबिंब त्यात दिसते. लोकसमजुती आणि लोकाचार यांचे दर्शन येथे होते. अथर्ववेदातून मिळणारी माहिती मानवशास्त्र आणि देवविषयक कल्पनांचा इतिहास यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. हा खऱ्या अर्थाने जनवेद किंवा बहुजनसमाजवेदच होय. ज्या कारणासाठी अथर्ववेद उपेक्षिला गेला, त्याचे ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावे, त्यामागील अंधश्रद्धा दूर करून त्यांच्यातील विज्ञान जाणून घेऊन विद्यार्थ्यांनी त्या ज्ञानाचा उपयोग समाजकल्याणासाठी करण्यास प्रवृत्त व्हावे, अथर्ववेदाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण विज्ञाननिष्ठ व्हावा, या हेतूने याची सविस्तर माहिती इथे देण्यात आलेली आहे.

### १.३.२.२ वैदिक जीवनाची वैशिष्टये –

वेदकालीन जीवन हा भारतीय संस्कृतीचा पाया मानला जातो ज्यामध्ये धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक आयुष्याचे आदर्श मांडले गेले आहेत. या कालखंडात धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक आदर्शांची स्थापना झाली होती. यज्ञ, पूजा, आणि देवतांची उपासना याला विशेष महत्त्व होते, तसेच समाजातील व्यक्तींना त्यांच्या वर्ण आणि आश्रमधर्मानुसार जीवन व्यतीत करण्याचे मार्गदर्शन दिले जात होते. कृषी, पशुपालन,

आणि व्यापार हे आर्थिक जीवनाचे मुख्य घटक होते. वेदांतून मानवाने नैतिकता, तत्त्वज्ञान, आणि धर्म यांचा आदरपूर्वक अभ्यास केला.वेदकालीन जीवनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

1. धार्मिक जीवन-

- यज्ञ आणि पूजा: वेदकालीन जीवनात यज्ञ हे सर्वात महत्वाचे धार्मिक कृत्य होते. यज्ञाद्वारे देवतांना प्रसन्न केले जाई आणि यज्ञाचे आयोजन समाजातील सर्व स्तरांमध्ये अत्यंत महत्त्वाचे मानले जाई. इंद्र, अग्नी, वरुण, सोम, आणि सूर्य या प्रमुख देवतांची पूजा केली जात असे. ऋग्वेदात या देवतांची स्तुती करणारे मंत्र आहेत.
- वेदांचा उपयोग: धार्मिक विधी आणि अनुष्ठानांमध्ये वेदातील मंत्रांचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जात असे. यजुर्वेदात यज्ञाचे नियम आणि मंत्र, सामवेदात यज्ञाच्या वेळी गायले जाणारे स्तोत्र, आणि ऋग्वेदात विविध देवतांच्या स्तुती आहेत.

2. सामाजिक जीवन

- वर्णव्यवस्था: समाजाची रचना मुख्यतः वर्णव्यवस्थेवर आधारित होती, जी ब्राह्मण (पुरोहित), क्षत्रिय (योद्धा), वैश्य (व्यवसायिक), आणि शूद्र (कामगार) या चार प्रमुख वर्णांमध्ये विभागली होती.मनुष्य शरीराचे जसे मुख, बाहू, उरु आणि पाय हे ४ प्रमुख अवयव तसे समाजाचे ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य आणि शूद्र हे ४ अवयव आहेत . गुण आणि कर्म यांच्या विभागानुसार समाजाचे ४ विभाग असल्याचा उल्लेख आढळतो. लोक युद्धे हि करत, सूक्ते हि रचत.कित्येक शुद्र मंत्रद्रष्टे ऋषी म्हणून प्रसिद्ध आहेत. उदा. सत्यकाम -जाबाल, कवष. वैदिक वर्णव्यवस्थेतश्रेष्ठ कनिष्ठतेचा निकष जन्म नसून ज्ञान होते. परंतु ही व्यवस्था नंतरच्या काळात जन्मावर आधारली जावू लागली.
- कुटुंबव्यवस्था: संयुक्त कुटुंबपद्धती वेदकालीन समाजात प्रचलित होती. कन्यादानाच्या पद्धतीपेक्षा स्वयंवराची पद्धत रूढ असावी. स्त्रियांना वर निवडण्याचे स्वातंत्र्य होते.वेदांमध्ये बालविवाह निषिद्ध मनाला आहे.शिवाय विधवा विवाहाचे समर्थन केले गेले आहे.
- स्त्री-पुरुष समानता: वेदकालीन काळात स्त्रियांना आदरणीय स्थान दिले गेले आहे. ती पुरुषाची सहयोगी, सहधर्मचारिणी आहे. तिचा उल्लेख ब्रह्मा असा ऋग्वेदात केला गेला आहे.  स्त्रियांनाही शिक्षणाचे आणि धार्मिक अनुष्ठानात सहभागी होण्याचे अधिकार होते. महिलांना गृहित कामांव्यतिरिक्त धार्मिक आणि सामाजिक कृत्यांमध्येही सहभागी होता येत असे. वेदात स्त्रियांच्या शौर्याचीही पुष्कळ चर्चा आहे. जसे ऋग्वेदात इंद्राणीचा उल्लेख आहे तसा स्त्री सेनेचाही उल्लेख आहे. शिवाय वेदांमध्ये मंत्राद्रष्टा ऋषीच्या रूपात त्यांचे योगदान स्पृहणीय आहे. ४२२ मंत्रांची द्रष्टा ह्षीका आहेत. यात विशेष उल्लेखनीय आहेत- इंद्राणी, शची, अपाला, घोषा,लोपामुद्रा, काक्षीवती.

3. आर्थिक जीवन

- कृषी आणि पशुपालन: वेदकालीन समाजाचा मुख्य व्यवसाय कृषी आणि पशुपालन होता. शेती हा आर्थिक जीवनाचा पाया होता, आणि गायींचे पालन ही समृद्धीचे प्रतीक मानले जात असे.

- विभिन्न उद्योग : वेदांमध्ये १४० वृत्ती अर्थात उद्योगांचा उल्लेख आहे. ऋग्वेदातुन हेही ज्ञात होते कि एकाच परीवाराथिल व्यक्ती विभिन्न उद्योग करत असत आणि गुण्यागोविंदाने राहत असत. काही उद्योग पुढीलप्रमाणे -वस्त्र उद्योग, रथाकार, कर्मार ( लोहार), यांत्रिक ( कारागीर,मेस्त्री), हिरण्यकार (सोनार), चर्मकार,पेशिता (Carving), सूचीकर्म (शिलाई काम) इत्यादी.

- व्यापार: व्यापार आणि विनिमय यांचे महत्त्व वेदकालीन जीवनात होते. व्यापारी वस्तूंचे विनिमय करीत असत आणि हा व्यापार मुख्यतः स्थानिक पातळीवर होई. अथर्ववेदात व्यापार साफालातापुर्वक करण्याचे काही गुण सांगितले आहेत. शिवाय तयार वस्तू स्थल,जल, समुद्री मार्गाने पाठवण्याचे उल्लेख ही आढळतात. त्याकाळी व्यापारासाठी नाण्यांचा वापर प्रचलित होता. निष्क, रुक्म, शतमान, कार्षापण अशी त्यांची नावे होत.

4. शैक्षणिक जीवन

- गुरुकुल पद्धती: वेदकालीन काळात गुरुकुल पद्धती शैक्षणिक प्रणाली म्हणून अस्तित्वात होती. विद्यार्थी गुरुकडे जाऊन शिक्षण घेत. प्राचीन शिक्षणाचा उद्देश शिष्याचा सर्वांगीण विकास हा होता. त्याची ज्ञानज्योती प्रबुद्ध करणे, ती अधिक प्रखर बनवणे आणि त्याच्या जीवनाला सर्वार्थाने प्रभावशाली बनवणे हे प्रमुख ध्येय होते. वेदांनी या उद्देश प्राप्तीसाठी तप म्हणजे कठोर शिस्त आणि दीक्षा म्हणजे आत्मसमर्पण हि दोन साधने सांगितलेली आहेत. शिवाय संयम आणि चरित्र या दोहोंना जास्त महत्व दिले जात होते.

- विषय: अथर्ववेद, गोपथ ब्राह्मण आणि छांदोग्य उपनिषद यांमध्ये विद्यांचा उल्लेख आहे. छांदोग्य मधील सूची सर्वात मोठी आहे. त्यानुसार विषय पुढीलप्रमाणे वेद, पुराण, वेदांग,पितृविद्या

  ( Anthropology),तत्त्वज्ञान, राशीविद्या अर्थात गणित, निधीविद्या अर्थात खनिजशास्त्र (Mineralogy) , वाकोवाक्य (law and logic ), एकायन (ethics ) , ब्रह्मविद्या (Spiritual Sciences) , भूतविद्या (Zoology), नक्षत्र विद्या ( ज्योतिष, Astronomy), आणि क्षत्रविद्या (शस्त्रविद्या ,Military Science), सर्पविद्या ( विष-विज्ञान , Toxicology), देवविद्या (Mythology), देवजनविद्या (गन्धर्व विद्या Music) यांसारख्या बहुविध विषयांवर शिक्षण दिले जाई.

- स्त्रियांचे शिक्षण: स्त्रियांनाही शिक्षण दिले जाई, आणि वेदातील मंत्र पठण करण्याची मुभा होती. प्रसिद्ध विदुषी जसे की गार्गी आणि मैत्रेयी यांची उदाहरणे या काळात पाहायला मिळतात.

5. धार्मिक ग्रंथ आणि साहित्य

- वेद: वेद हे समाजातील धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचे प्रमुख आधारस्तंभ होते. ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, आणि अथर्ववेद हे चार वेद धार्मिक ज्ञानाचे स्रोत होते.

- उपनिषदं: वेदांचा गूढार्थ आणि तत्त्वज्ञान यावर आधारित उपनिषदांनी वेदकालीन जीवनावर प्रभाव टाकला. उपनिषदांमध्ये आत्मा, ब्रह्म, मोक्ष, आणि कर्म यांवर चर्चा आहे.

6. नैतिकता आणि तत्त्वज्ञान

- धर्म आणि कर्म: वेदकालीन जीवनात धर्माचे पालन आणि कर्माच्या सिद्धांतावर भर दिला जात होता. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या वर्ण आणि आश्रम धर्माचे पालन करणे महत्त्वाचे मानले जात होते.सत्य , ज्ञान, सामंजस्य , मानसिक एकोपा या नैतिक कल्पनाच महिमा ऋग्वेदात वर्णिला आहे. माणसाच्या सद्भावनेची प्रशंसा केलेली आहे.

- आश्रमव्यवस्था: व्यक्ती जीवनाच्या व्यवस्थेसाठी आश्रम व्यवस्था सांगितली गेली आहे. अशा प्रकारची उत्कृष्ठ व्यवस्था जगात इतरत्र आढळणे दुर्मिळच. मनुष्य जीवन चार आश्रमांमध्ये विभागले गेले होते: ब्रह्मचर्य (शिक्षणाचा काळ), गृहस्थ (कुटुंब सांभाळणे), वानप्रस्थ (अरण्यात जीवन व्यतीत करणे), आणि संन्यास (मोक्षासाठी तपस्या). व्यक्तीने त्या त्या आश्रमामध्ये आपली कर्तव्य पूर्ण करणे क्रमप्राप्त होते.

7. विज्ञान आणि तंत्रज्ञान

- ज्योतिषशास्त्र आणि गणित: वेदकालीन जीवनात ज्योतिषशास्त्राचे महत्त्व होते. यज्ञाच्या वेळा ठरवण्यासाठी आणि धार्मिक अनुष्ठानांच्या यशासाठी ज्योतिषशास्त्राचा वापर केला जाई.

- आयुर्वेद: आरोग्याच्या दृष्टीने आयुर्वेदाचा अभ्यास सुरू झाला होता. अथर्ववेदात आरोग्य व औषधोपचारावर आधारित काही मंत्रांचा उल्लेख आहे.

8. सांस्कृतिक जीवन

- संगीत आणि नृत्य: सामवेदात संगीत आणि नृत्य यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. धार्मिक कृत्यांमध्ये संगीताचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात होता.

- कला आणि साहित्य: काव्यशास्त्र, नाटक, आणि नृत्य यांचा उगम वेदकालात झाला, आणि समाजातील सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनले.

9. पर्यावरणाची पूजाः

- प्रकृतीची महती: वेदकालीन लोकांची देवतांची उपासना प्रकृतीच्या विविध घटकांशी संबंधित होती. सूर्य, अग्नी, जल, वायू, आकाश यांची पूजा केली जाई.

- पर्यावरणाचे संरक्षण: निसर्गाच्या महत्त्वाचे भान वेदकालीन समाजाला होते. निसर्गाशी ताळमेळ साधून जीवन जगण्याची शिकवण वेदांमध्ये आहे.

एकूणच वेदकालीन जीवन धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, आणि सामाजिक आदर्शांवर आधारित होते. त्यात प्रकृतीशी जुळवून घेतलेले जीवन, धार्मिक विधींची शुद्धता, आणि नैतिकता यांचा मिलाफ दिसतो.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -२

रिकाम्या जागा भरा.

१. एकूण वेदसंख्या _____ आहे.
२. वेद शब्द ________ या मुळ धातुपासून बनला आहे.

३. धर्म, _____, काम आणि________हे ४ पुरुषार्थ वर्णिलेले आहेत.

४. ऋग्वेद म्हणजे _____________ ज्ञानसंग्रह.

५. सामवेदात ऋग्वेदातील ऋचांचे _____________ कसे करावे याचे विवेचन आहे.

६. वेदकालीन समाजाचा मुख्य व्यवसाय _____________ आणि पशुपालन होता.

## १.३.३ भारतीय तत्वज्ञान प्रणाली- पुराण, इतिहास आणि सुभाषिते

### १.३.३.१ **भारतीय तत्वज्ञान प्रणाली- पुराण:**

पुराणे हे संस्कृत भाषेतील प्राचीन भारतीय ग्रंथ होत. पुराण' या शब्दाचा वाच्यार्थ 'प्राचीन' असा आहे. वायूपुराणाच्या मते पुरा(पूर्वी) आणि अन् (अस्तित्वात असणे) ह्या शब्दांपासून 'पुराण' हा शब्द बनलेला असून 'पूर्वी अस्तित्वात असणारे' असा त्याचा अर्थ आहे. यास्काचार्यांच्या मते 'पुरा नवम्' म्हणजे 'प्राचीन काळी नवे असणारे' आणि पद्मपुराणाच्या मते परंपरेची इच्छा करणारे, ते पुराण होय. पुराणसंज्ञेच्या या सर्व व्युत्पत्ती पुराणाचा प्राचीन काळाशी संबंध जोडतात. पुराण हा शब्द 'प्राचीन' या अर्थाने ऋग्वेदात अनेकदा आला आहे. प्रारंभीच्या काळात प्राचीन कथा व आख्यायिका या परंपरागत वाङ्मयालाच पुराण हे विशेषण लावले जात असावे. त्या काळात त्यांच्या संहिता मात्र बनल्या नव्हत्या, असे दिसते. अशा कथांच्या स्वरूपात पुराणे ही वेदसंहितांच्याही आधीपासून अस्तित्वात असण्याची शक्यता आहे. प्रांरभीच्या या विशेषणार्थी शब्दाचे नंतर नामात रूपांतर झाले. पुराणाचे 'महापुराणे' व 'उपपुराणे' असे दोन प्रकार आहेत. बहुतेक वेळा महापुराणांचा निर्देश करताना 'महापुराणे' असे न म्हणता 'पुराणे' ही संज्ञा वापरली जाते.मराठी विश्वकोशात पुराणांबद्दल विस्तृतपणे सांगण्यात आलेले आहे.ते असे- पुराणांविषयी केलेली विधाने ही सामान्यतः स्थूलमानाने केलेली आहेत. कारण पुराणांची नावे,संख्या,त्यांच्यातील अध्यायांची व श्लोकांची संख्या, त्यांचा काळ, त्यांचे विषय, त्यांच्यातील प्रक्षेप इ. बाबतीत त्या त्या पुराणांची स्वत:ची मते, त्यांच्याविषयीची इतर पुराणांची व ग्रंथाची मते, विद्वानांनी त्यांविषयी काढलेले निष्कर्ष इत्यादींचा आपापसांत मेळ बसणे, हे अत्यंत अवघड आहे. एवढेच नव्हे, तर एकाच विद्वानाने केलेल्या दोन विधानांत मेळ बसत नाही, असेही अनेकदा दिसते. पुराणसंहिता या वेदसंहितांप्रमाणे निश्चित व अपरिवर्तनीय स्वरूपात राहिलेल्या नसल्यामुळेही त्यांच्याविषयी काही निश्चित निर्णय घेणे अवघड ठरते.

पुराणांची संख्या किती याबाबत हि मतभिन्नता आढळते. तथापि मुख्य पुराणे एकूण १८ असून ती महर्षी व्यास मुनी यांनी लिहिली असे मत प्रचलित आहे. त्यातील काही नावे पुढीप्रमाणे-ब्रह्मपुराण, पद्मपुराण, विष्णूपुराण, वायूपुराण मार्कंडेयपुराण, गरुडपुराण इत्यादी. भक्तीबरोबरच ज्ञान, कर्मकांड, योगविषयक तसेच भौतिक विषयांचे स्पष्टीकरण यांत आढळते. पुराणांचा लिहिण्याचा काळ वेदांच्या नंतरचा मानला जातो.

कालक्रमानुसार पुराणांचे विषय आणि स्वरूपही सदैव बदलत गेले आहेत. पुराणांच्या संहिता तयार होण्यापूर्वी लोकसाहित्याच्या स्वरूपातील पुराणात प्रामुख्याने प्राचीन आख्याने होती. व्यासांनी आख्याने, उपाख्याने, गाथा व कल्पशुद्धी या विषयांच्या आधारे पुराणसंहिता तयार केल्या. आख्यान व उपाख्यान ही दोन्ही कथानकेच असतात. स्वतः पाहिलेल्या घटनेचे वर्णन हे आख्यान व ऐकलेल्या घटनेचे वर्णन हे उपाख्यान असे एक मत असून, दुसऱ्या एका मतानुसार आख्यान हे आकाराने मोठे आणि उपाख्यान छोटे असते. ज्यांचा कर्ता कोण आहे, हे माहीत नाही, अशी जी अनेक परंपरागत व लोकप्रसिद्ध पद्ये वैदिक वाङ्मयात व पुराणांत आढळतात, त्यांना गाथा म्हणतात. त्यांत प्रसिद्ध राजांच्या पराक्रमांची आणि दानांची वर्णने असतात. *ऋग्वेद*संहितेतील अशा

गाथांना ‘नाराशंसी’ असे म्हणतात. या गाथांना ‘श्लोक’ असेही म्हटले जाई. कल्पशुद्धी या शब्दाच्या अर्थविषयी मतभेद असून त्याचे श्राद्धकल्प, धर्मशास्त्रातील सर्व विषय इ. अर्थ करण्यात आले आहेत.

### १.३.३.२ **भारतीय तत्वज्ञान प्रणाली- इतिहास**

भारतीय तत्वज्ञान हा जगातील सर्वात प्राचीन आणि गहन तत्त्वज्ञानांपैकी एक आहे. या तत्त्वज्ञानाच्या विविध प्रणालींनी हजारो वर्षांपासून भारतीय संस्कृती, धर्म, आणि जीवनशैलीवर परिणाम केला आहे. भारतीय तत्वज्ञानाचे मुख्यतः दोन प्रकार आहेत: आस्तिक (वेदांना प्रमाण मानणारे) आणि नास्तिक (वेदांना प्रमाण न मानणारे).

### **अ. आस्तिक तत्त्वज्ञान प्रणाली (वेदांना प्रमाण मानणारे)**

भारतीय तत्त्वज्ञानातील षड्दर्शन म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानाचे सहा प्रमुख संप्रदाय. हे संप्रदाय "आस्तिक" म्हणजेच वेदांचा स्वीकार करणारे संप्रदाय मानले जातात. षड्दर्शनांचे प्रत्येक तत्त्वज्ञान वेगळ्या दृष्टिकोनातून विश्व, आत्मा, परमेश्वर, आणि मुक्ती यांचा अभ्यास करते. षड्दर्शनांमध्ये न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्व मीमांसा, आणि वेदांत यांचा समावेश होतो.

1. न्याय दर्शन:
   - संस्थापक:गौतम ऋषी
   - मुख्य तत्त्व: तर्क आणि ज्ञानप्राप्ती. न्याय दर्शनाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे योग्य तर्क वापरून सत्य आणि ज्ञान प्राप्त करणे. न्याय शास्त्रात चार ज्ञानप्राप्तीचे साधने सांगितली आहेत - प्रत्यक्ष, अनुमान, उपमान आणि शब्द.
   - उद्दिष्ट: तर्काच्या साहाय्याने मोक्ष प्राप्त करणे.
2. वैशेषिक दर्शन:
   - संस्थापक: कणाद ऋषी
   - मुख्य तत्त्व: वैशेषिक शास्त्रात विश्वाच्या रचनेचे स्पष्टीकरण "अणू" या संकल्पनेवर आधारित आहे. प्रत्येक वस्तू सूक्ष्म अणूंच्या एकत्रीकरणाने तयार होते.
   - उद्दिष्ट: नैतिक जीवन जगून मोक्ष प्राप्त करणे.
3. सांख्य दर्शन:
   - संस्थापक: कपिल ऋषी
   - मुख्य तत्त्व: सांख्य शास्त्रात दोन मुख्य घटक मानले जातात: *पुरुष* (चेतना) आणि *प्रकृती* (भौतिक जग). पुरुष हा शुद्ध चेतना असून, प्रकृती ही भौतिकता आहे. दोघांच्या भेदाच्या जाणिवेतून मोक्ष साधता येतो.

- उद्दिष्ट: पुरुष आणि प्रकृती यांचा भेद जाणून मोक्ष प्राप्त करणे.

4. योग दर्शन:

- संस्थापक: पतंजली ऋषी
- मुख्य तत्त्व: योग दर्शन सांख्य शास्त्राशी जोडलेले आहे, पण त्यात ध्यान, शारीरिक आणि मानसिक शिस्तीवर भर दिला जातो. योगाच्या आठ अंगे आहेत - यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी.
- उद्दिष्ट: योगाच्या साधनेद्वारे मन आणि शरीरावर नियंत्रण ठेवून आत्मबोध आणि मोक्ष प्राप्त करणे.

5. पूर्व मीमांसा दर्शन:

- संस्थापक: जैमिनी ऋषी
- मुख्य तत्त्व: पूर्व मीमांसा वेदाच्या कर्मकांडावर आधारित आहे. वेदांमध्ये दिलेल्या कर्मकांडांची पूजा, यज्ञ यांद्वारे पालन केल्यास मोक्ष प्राप्त होतो. वेदांचे प्रामाण्य हे शाश्वत आणि सर्वोच्च मानले जाते.
- उद्दिष्ट: कर्मकांडाचे पालन करून मोक्ष प्राप्त करणे.

6. वेदांत दर्शन:

- संस्थापक: शंकराचार्य, रामानुजाचार्य, माध्वाचार्य (विविध शाखांचे प्रवर्तक)
- मुख्य तत्त्व: वेदांताचे तत्त्वज्ञान उपनिषदांवर आधारित आहे आणि ते आत्मा, ब्रह्म, आणि विश्व यांविषयीचे तात्त्विक स्पष्टीकरण देते. वेदांताचे प्रमुख तीन उपविभाग आहेत:
  - अद्वैत वेदांत (शंकराचार्य): आत्मा आणि ब्रह्म एकच आहेत.
  - विशिष्टाद्वैत (रामानुजाचार्य): आत्मा आणि ब्रह्म यांचा भेद आहे, परंतु आत्मा ब्रह्माशी जोडलेला आहे.
  - द्वैत वेदांत (माध्वाचार्य): आत्मा आणि ब्रह्म हे कायमचे वेगळे आहेत.
- उद्दिष्ट: ब्रह्माच्या जाणिवेतून मोक्ष प्राप्त करणे.

**ब. नास्तिक तत्त्वज्ञान प्रणाली (वेदांना प्रमाण न मानणारे)**

म्हणजे असे संप्रदाय किंवा विचारसरणी, जे वेदांना प्रामाण्य मानत नाहीत. भारतीय तत्त्वज्ञानात तीन प्रमुख नास्तिक संप्रदाय आहेत: बौद्ध धर्म, जैन धर्म, आणि चार्वाक. हे संप्रदाय वेदांची प्रामाण्यता नाकारतात आणि मुक्ती किंवा जीवनाचे तत्त्वज्ञान यासाठी वेगळे मार्ग मांडतात.

1. बौद्ध धर्म:

- संस्थापक: गौतम बुद्ध
- मुख्य तत्त्व: बौद्ध धर्मात चार आर्यसत्ये आणि अष्टांगिक मार्ग यांचे महत्त्व आहे. गौतम बुद्धांनी आत्म्याचे शाश्वत अस्तित्व नाकारले आणि "अनात्मवाद" मांडला, ज्यात व्यक्तीचे "स्व" (आत्मा) स्थायी नाही असे सांगितले. सर्व दु:खाचे कारण आसक्ती आहे, आणि आसक्ती नष्ट केल्यास निर्वाण प्राप्त होते.
- चार आर्यसत्ये:
    1. दु:ख आहे (दु:ख)
    2. दु:खाचे कारण आहे (दु:ख कारण)
    3. दु:ख नष्ट होऊ शकते (दु:ख निरोध)
    4. दु:ख नष्ट करण्याचा मार्ग आहे (दु:ख निरोध मार्ग)
- अष्टांगिक मार्ग: यामध्ये योग्य दृष्टिकोन, विचार, वाणी, कर्म, उपजीविका, प्रयत्न, ध्यान, आणि समाधी यांचा समावेश आहे.

  बौद्ध धर्माने भारताबाहेर आशिया, विशेषतः तिबेट, चीन, जपान आणि दक्षिण पूर्व आशियामध्ये व्यापक प्रसार केला आहे.

2. जैन धर्म:

- संस्थापक: महावीर (२४वे तीर्थंकर)
- मुख्य तत्त्व: जैन धर्म अहिंसा (अ हिंसा) या तत्त्वावर आधारित आहे. जैन धर्मानुसार सर्व सजीवांना आत्मा आहे आणि प्रत्येक आत्मा शुद्ध आणि शाश्वत आहे. कर्माचे बंधन नष्ट करून आत्मा मोक्ष प्राप्त करू शकतो. जैन धर्मातील मुख्य तत्त्वज्ञान *अनेकांतवाद* आहे, ज्यात वास्तवाचे अनेक दृष्टिकोन आहेत असे सांगितले जाते.
- तत्त्वे:
    1. अहिंसा (अ हिंसा) - कोणत्याही सजीवाला हानी पोहोचवू नये.
    2. सत्य (सत्य बोलणे) - नेहमी सत्य बोलावे.
    3. अस्तेय (चोरी न करणे) - कोणाचेही मालमत्ता चोरू नये.
    4. ब्रह्मचर्य (संयम) - इंद्रियावर संयम ठेवावा.
    5. अपरिग्रह (अल्पसंतोष) - अत्यधिक संपत्ती किंवा वस्त्रसंपत्ती न ठेवणे.

जैन धर्मातील साधू आणि साध्वी हे कडक तपश्चर्या करून मोक्ष प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात.

3. चार्वाक (भौतिकवाद):

- संस्थापक: बृहस्पति (परंपरागत मत)
- मुख्य तत्त्व: चार्वाक तत्त्वज्ञान हा भारतीय तत्त्वज्ञानातील एकमात्र भौतिकवादी संप्रदाय आहे. चार्वाक तत्त्वज्ञानाने आत्मा, पुनर्जन्म, मोक्ष यांना नाकारले आहे. याचा मुख्य आधार भौतिक जीवनात इहलोकाचे सुख भोगणे हा आहे. यांचे तत्त्वज्ञान "लोकायत" म्हणूनही ओळखले जाते, ज्याचा अर्थ "लोकांमध्ये पसरलेले" असा होतो.
- मुख्य विचार:
    - प्रत्यक्ष अनुभव हाच सत्याचा आधार आहे.
    - कर्म आणि मोक्ष यांची संकल्पना फसवी आहे.
    - "ऋणं कृत्वा घृतं पिबेत्।" (कर्ज काढून सुद्धा तूप प्या) हे चार्वाक तत्त्वज्ञानाचे एक लोकप्रिय विधान आहे, ज्याचा अर्थ हे तत्त्वज्ञान जीवनाचा आनंद घेत जगण्यावर भर देते.

    चार्वाक तत्त्वज्ञानाने वैदिक धर्मातील यज्ञ, तपश्चर्या आणि वेदांचे प्रामाण्य नाकारले. यामुळे हा संप्रदाय वेदांपासून फार वेगळा मानला जातो.

नास्तिक तत्त्वज्ञान हे भारतीय तत्त्वज्ञानाच्या विविधतेचा एक महत्त्वाचा भाग आहे. बौद्ध, जैन, आणि चार्वाक हे संप्रदाय आपापल्या मार्गांनी जीवनाचे आणि मुक्तीचे वेगवेगळे दृष्टिकोन मांडतात.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या या प्रणालींनी भारतीय समाज, धर्म, आणि अध्यात्मिक जीवनावर अमूल्य प्रभाव टाकला आहे. यामुळेच भारतीय तत्त्वज्ञान जगभरात प्रसिद्ध आणि आदरणीय ठरले आहे.

### १.३.३.३ **भारतीय तत्वज्ञान प्रणाली- सुभाषिते**

पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलमन्नं सुभाषितम् ।

मूढैः पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञा प्रदीयते ॥

अर्थात् पृथ्वीवर पाणी, अन्न आणि सुभाषित ही तीन रत्ने आहेत परंतु मूर्ख लोक दगडाच्या तुकड्यालाच रत्न असे नाव देतात. या श्लोकावरून सुभाषिताची महती लक्षात येते.

अर्थ:

सुभाषिते ही संस्कृत साहित्यातील एक अमूल्य आणि समृद्ध भांडार होत. ही सुभाषिते जीवनाच्या सर्व अंगोपांगांना स्पर्श करणारी आहेत. साहित्यगुणांनीही ही सुभाषिते समृद्ध आहेत. **सुभाषिते** म्हणजे सुंदर वाक्ये किंवा ज्ञानपूर्ण वचन. सुभाषित हा शब्द दोन भागांत विभागला आहे: सु म्हणजे सुंदर आणि भाषित म्हणजे बोललेले किंवा

वाक्य. सुभाषिते ही संस्कृत भाषेत असलेली ज्ञानपर, नैतिक, सामाजिक, धार्मिक आणि व्यवहारिक जीवनातील तत्त्वे सांगणारी वाक्ये आहेत. ती प्राचीन काळात शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि ऋषी-मुनींनी रचली आहेत.

सुभाषितांचे स्वरूप:

सुभाषिते सामान्यतः दोन किंवा चार ओळींच्या श्लोकांच्या स्वरूपात असतात आणि त्यांतून जीवनातील विविध अनुभवांवर आधारित उपदेश दिलेला असतो. या श्लोकांमध्ये नैतिकता, शिस्त, सत्कर्म, सत्य, प्रेम, साहाय्य, आणि धैर्य यांसारख्या तत्त्वांचे वर्णन असते. त्याचप्रमाणे या वचनांमध्ये व्यावहारिक ज्ञान, जीवनाची अनिश्चितता, काळाचे महत्व, मैत्री, शत्रू, आणि संकटांचा सामना कसा करावा यावर उपदेश दिला जातो. केवळ सुभाषितनिर्मितीच्याच हेतूने लिहिलेल्या काव्यपंक्तिखेरीज कालिदास, भारवी, माघ, भवभूती इ. अनेक श्रेष्ठ संस्कृत साहित्यिकांच्या लेखनातून अनेक वैदग्ध्यपूर्ण आणि मनोवेधक सुभाषिते आढळून येतात. काही ग्रंथ– उदा., पंचतंत्र, हितोपदेश – हे नीतिबोधक असल्यामुळे त्यांमधून तर अनेक सुभाषिते आढळतात. भर्तृहरी आपल्या शतकत्रयांतून अनेक उत्तमोत्तम सुभाषिते सादर करतो. भल्लटाचे भल्लट शतक, सिल्हणाचे शांतिशतक ह्यांत सुभाषिते आहेतच.

सुभाषितांचे महत्त्व:

सुभाषिते म्हणजे शाश्वत ज्ञानाचे भांडार. संस्कृत साहित्यामध्ये अनेक ग्रंथ, श्लोक आणि सुभाषिते आहेत जी कालबाह्य होणार नाहीत, आणि त्यातील तत्त्वे आजच्या काळातही तितकीच उपयुक्त आहेत. ती लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना बोधप्रद ठरतात आणि जेंव्हा जेंव्हा कठीण काळ येतो त्यावेळी  हि सुभाषिते साथ देतात, योग्य मार्गदर्शन करतात, जगण्याचे बळ देतात.

सुभाषितांची उदाहरणे:

सुभाषितांची काही प्रातिनिधिक उदाहरणे पुढीलप्रमाणे

१. सुभाषित:
विद्या विवादाय धनं मदाय शक्तिः परेषां परपीडनाय।
खलस्य साधो: विपरीतमेतत् ज्ञानाय दानाय च रक्षणाय॥

अर्थ:
दुर्जन माणसाकडे विद्या असली तर ती विवादासाठी वापरतो, धन मिळालं तर तो गर्व करतो, आणि शक्ती मिळाल्यास इतरांना पीडा देतो. परंतु सज्जन माणसाकडे विद्या असली तर ती ज्ञानप्राप्तीसाठी असते, धन असले तर दान करण्यासाठी आणि शक्ती असली तर रक्षणासाठी.
तात्पर्य:
सज्जन आणि दुर्जन यांच्यातील मुख्य फरक त्याच्या विद्या, धन, आणि शक्तीच्या वापरात आहे.

२. सुभाषित:
अयम निजः परो वेति गणना लघुचेतसाम्।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्॥

अर्थ:
‘हा आपला आणि तो परका’ असे जे लोक मानतात ते संकुचित मनाचे असतात. परंतु उदार वृत्तीचे लोक संपूर्ण पृथ्वीला एकच कुटुंब मानतात.
तात्पर्य:
मोठ्या हृदयाने आपण सर्वांना आपले मानावे आणि जागतिक एकता, ऐक्य याचा विचार करावा.

१०.सुभाषित:

उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः॥

अर्थ:
कार्ये प्रयत्नांमुळेच यशस्वी होतात, केवळ इच्छाशक्तीने नाही. जसे झोपलेल्या सिंहाच्या तोंडात मृग स्वतःहून येत नाहीत.
तात्पर्य:
फक्त इच्छा करून काहीच मिळणार नाही. कठोर मेहनत आणि प्रयत्न हवेच.

४. सुभाषित:

क्षणशः कणश्चैव विद्यामर्थं च साधयेत!

क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम !

अर्थ:

क्षणा़क्षणाने ज्ञान आणि कणाकणाने धन मिळवावे.क्षणाचा त्याग केल्यास विद्या कोठुन मिळणार आणि कणाचा त्याग केल्यास धन कोठुन मिळणार?

तात्पर्य:
विद्या आणि धन हे दोन्ही हळूहळू, छोटे-छोटे संचित करूनच मिळवले जातात. जसे प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे, तसेच प्रत्येक कण (धन) महत्त्वाचा आहे. जर तुम्ही क्षणाचा त्याग केला, म्हणजेच वेळेचे महत्त्व ओळखले नाही, तर तुम्हाला विद्या कशी प्राप्त होईल? त्याचप्रमाणे, जर तुम्ही धनाचा (छोट्या-छोट्या बचतीचा) त्याग केला, तर धनसंपत्ती कशी जमवता येईल?

सुभाषिते आपल्या दैनंदिन जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. ती आपल्याला नैतिकतेचे धडे देतात आणि योग्य-अयोग्य यातील फरक ओळखण्याची क्षमता वाढवतात. संकटसमयी संयम राखण्याची शिकवण सुभाषितांमधून मिळते. जीवनातील प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचे आणि योग्य निर्णय घेण्याचे मार्गदर्शन ती करतात. सुभाषिते वाचनाने मनःशांती मिळते आणि आत्मविश्वास वाढतो.

स्वयं अध्ययन प्रश्न – ३

रिकाम्या जागा भरा.

१. पुराण’ या शब्दाचा वाच्यार्थ ........... असा आहे.

२. न्याय दर्शनाचे संस्थापक ----------------- हे होत.

३. न्याय दर्शनाचे उद्दिष्ट ------------------- हे आहे.

४. वैशेषिक शास्त्रात विश्वाच्या रचनेचे स्पष्टीकरण ------------------ आधारित आहे.

५. सुभाषिते म्हणजे -------------होय.

### १.३.४ वारकरी संप्रदाय आणि वारी

### अ. वारकरी संप्रदाय

**स्वरूप आणि घडण** -

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय भक्तिसंप्रदाय आहे. 'वारकरी' हा शब्द 'वारी करणारा' ह्या अर्थाने वापरला जातो, आणि 'वारी' म्हणजे नियमित यात्रा किंवा व्रत, अशा अर्थाने घेतले जातो. उपास्य देवतेच्या, कोणतीही असो, वारीला नियमितपणे जाणाऱ्याला 'वारकरी' असे म्हणता येते. येरझारांमध्ये जशी वारंवारता असते, तशीच येथे देखील अपेक्षित आहे. मात्र, वारीकरी संप्रदाय म्हणजे विशेषतः पंढरपूरच्या विठोबाशी संबंधित असलेला संप्रदाय मानला जातो. विठोबा, विठ्ठल किंवा पांडुरंग ह्या उपास्य दैवताच्या वारीला संप्रदायाने ज्या प्रकारे महत्त्व दिले आहे, ते अन्य कोणत्याही पंथातल्या उपास्य दैवताच्या वारीला दिलेले नाही.

वारकरी संप्रदायाच्या अनुयायांनी प्रत्येक वर्षी आषाढ शुद्ध एकादशी आणि कार्तिक शुद्ध एकादशीच्या दिवशी पंढरपूरला जाऊन श्रीविठ्ठलाची वारी केली पाहिजे. शुद्ध माघी एकादशी आणि शुद्ध चैत्री एकादशी ह्या दिवशीही पंढरपूर येथे मोठ्या संख्येने वारकरी जमतात, परंतु आषाढी एकादशी आणि कार्तिकी एकादशी ह्या दोन वाऱ्या विशेष महत्त्वाच्या मानल्या जातात. आषाढी एकादशीला विशेष महत्व आहे. ज्यांना वर्षातून एकदाच पंढरपूर येणे शक्य आहे, त्यांनी आषाढी किंवा कार्तिकी एकादशीस यावे; मात्र वारकऱ्यांनी प्रतिवर्षी किमान एकदा वारी करणे आवश्यक आहे. श्रीज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर, वारकरी संप्रदायाचे अनुयायी कार्तिक वद्य एकादशीस आळंदीत जमू लागले.

वारीकरी संप्रदायाला 'माळकरी संप्रदाय' असेही एक पर्यायी नाव आहे, कारण प्रत्येक वारकऱ्याच्या गळयात तुळशीच्या १०८ मण्यांची माळ असते. इतर धर्मपंथांत माळेला स्मरणी म्हणून महत्त्व आहे, परंतु वारकरी संप्रदायात मण्यांची माळ घालणे म्हणजे आध्यात्मिक पुनर्जन्म घेणे असे मानले जाते. मण्यांची माळ फक्त स्मरणीचे साधन नाही, तर ती आध्यात्मिक जीवनाचे प्रतीक आहे.

वारीकरी संप्रदाय भागवत धर्माचा एक भाग आहे आणि याला 'भागवत धर्म' असेही म्हटले जाते. भागवत धर्म म्हणजे वैष्णव संप्रदाय, ज्यामध्ये विष्णू आणि विशेषतः त्याचा कृष्णावतार वासुदेव

भगवान उपास्य मानला जातो. वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत विठोबा हे श्रीकृष्णाचे रूप मानले जाते, ज्यामुळे पंढरपूरला 'दक्षिण द्वारका' असे संबोधले जाते.

वास्तविक आराध्य दैवत विठ्ठलाचे निर्देश श्रुतिस्मृतिपुराणांत आलेले नाहीत. विष्णूच्या अवतारात तसेच विष्णू सहस्त्र नामातही त्याचा उल्लेख आढळत नाही. असे असूनही विठ्ठलाला इसवी सनाच्या अकराव्या-बाराव्या शतकांपासून असाधारण अशी वैष्णव प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. विठ्ठल हे नाव विष्णूपासून बनले, असे मत काही अभ्यासकांनी व्यक्त केलेले आहे. पंढरपूरचा विठोबा वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत असल्यामुळे पंढरपूर आणि त्यातील चंद्रभागा नदी हे वारकऱ्यांचे प्रमुख तीर्थस्थान मानले जाते. विठोबा हा श्रीकृष्णाचे रूप मानला जात असल्यामुळे, वारकरी संप्रदाय कृष्णोपासक देखील आहे. परंतु, रामाची पूजा ही संप्रदायात आहेच. वारकरी संप्रदाय द्वारका आणि काशी यांना देखील पवित्र मानतो, तसेच चंद्रभागा नदीसह इंद्रायणी, गोदावरी, कऱ्हा, आणि तापी या नद्या देखील पवित्र मानतो. गंगा आणि कृष्णा या हिंदू धर्मातील इतर पवित्र नद्यांना देखील संप्रदाय मान्यता देतो.

वारकरी संप्रदायाला प्रमाणभूत ग्रंथ म्हणून गीता, भागवतपुराण, ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरीवरील हरिपाठ, संस्कृतातील भागवतपुराणाच्या एकादश स्कंधावर एकनाथांनी लिहिलेल्या एकनाथी भागवत, भागवतपुराणाच्या द्वितीय स्कंधातील विशिष्ट श्लोकांवरील एकनाथांचे चतुःश्लोकी भागवत, एकनाथांचा हरिपाठ आणि तुकारामांची अभंगगाथा हे मानले जाते. विशेषतः ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकारामांची अभंगगाथा ही संप्रदायाची प्रस्थानत्रयी मानली जाते. इतर संतांची रचनाही वारकरी संप्रदायाने आदरपूर्वक वाचली जाते.

वास्तविक वर्णाश्रमधर्मातील अडचणी आणि समाजाने झिडकारलेल्या दुःखाचा अनुभव ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरांचे आईवडील आणि भावंडांनी अनुभवला. या अनुभवांनी त्यांच्यात शूद्र आणि अति-शूद्रांबद्दल गहरी सहानुभूती निर्माण केली. ज्ञानेश्वरी या ग्रंथामुळे त्यांनी आपल्या विचारांची आणि तत्त्वज्ञानाची रुंदता सामान्य जनतेसाठी मराठी भाषेत दर्शवली. हे दर्शवले की अध्यात्मिक ज्ञान फक्त एक विशिष्ट वर्गापुरते मर्यादित नाही, तर सामान्य माणसालाही ते प्राप्त करता येते. त्यांच्या समकालीन नामदेव हे वारकरी पंथाचे प्रारंभिक प्रचारक होते, आणि त्यांनी भारतभर भ्रमण करून पंथाचा प्रसार केला.

ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला एक भक्कम तत्त्वज्ञानाचा आधार दिला, तर नामदेवांनी ईश्वरभक्तीचे आदर्श समजावले. ज्ञानेश्वरीं आणि नामदेवांनी बहुजन समाजाच्या आध्यात्मिक आकांक्षांना जागे केले आणि त्यांना आत्मविष्काराची मार्ग दाखवली.

**वारकरी पंथ तत्वज्ञान-**

वारकरी पंथाचे तत्त्वज्ञान भारतीय तत्त्वज्ञानाच्या विविध संप्रदायांमध्ये एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. या पंथाचे तत्त्वज्ञान मुख्यतः श्री विठ्ठलाच्या उपासनेवर आधारित आहे आणि ते भक्तिपंथाचा एक उत्कृष्ट उदाहरण आहे. येथे काही मुख्य तत्त्वज्ञान:

१ ईश्वरभक्ती (भक्ति): वारकरी पंथाचा मुख्य तत्त्वज्ञान म्हणजे भक्तिपंथ. विठोबा या उपास्य दैवतावर भक्तिपूर्वक विश्वास ठेवला जातो. भक्ती हीच मोक्षाची प्राप्तीचा मार्ग मानला जातो.

२ सर्वसमता (समभाव): वारकरी पंथाने सर्व जाती, धर्म आणि वर्गातील लोकांसाठी समानतेचा संदेश दिला आहे. त्यांनी वर्णाश्रमधर्माच्या अडचणींना विरोध केला आहे आणि शूद्र, अति-शूद्रांनाही मान दिला आहे.

३ साधना (आध्यात्मिक साधना): वारकरी पंथात भजन, कीर्तन, अभंग आणि कीर्तनाच्या माध्यमातून साधना केली जाते. यामध्ये तुळशीच्या १०८ मण्यांची माळ घालणे आणि विठोबा किंवा श्रीविठ्ठलाच्या मंत्रांचा जप करणे महत्वाचे मानले जाते.

४ विविधता स्वीकारणे: पंथाने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक संदर्भांतील लोकांचे स्वागत केले आहे. यामुळे पंथाचे तत्त्वज्ञान विविध भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीत स्वीकारले गेले आहे.

५ पुण्यभूमी व तीर्थयात्रा: पंढरपूर ही वारकरी पंथाची मुख्य पुण्यभूमी आहे. आषाढी आणि कार्तिकी एकादशीस पंढरपूर येथे वारी करण्याची परंपरा आहे. या वारीत सहभागी होणे म्हणजे भक्तीचे महत्त्व स्वीकारणे आणि तत्त्वज्ञानाच्या प्रक्रियेत सहभागी होणे.

६ साधू आणि संतांची महत्त्व: ज्ञानेश्वरी, नामदेव, तुकाराम, चोखामेळा यांसारख्या संतांचा वारकरी पंथावर मोठा प्रभाव आहे. त्यांच्या रचनांमधून भक्तिपंथाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला जातो.

७ आध्यात्मिक अनुभव: तत्त्वज्ञानानुसार, आत्मज्ञान आणि मोक्षाच्या प्राप्तीसाठी आत्यंतिक भक्ती आणि साधना हे प्रमुख आहेत. विठोबा उपास्य दैवत आहे आणि भक्तीच्या माध्यमातून आत्मसाक्षात्कार आणि मोक्ष साधता येतो.

वारकरी पंथाचे तत्त्वज्ञान साध्या जीवनशैलीसह अत्यंत गहन आणि समृद्ध आहे. या तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि आचरण लोकांना आध्यात्मिक उन्नतीकडे नेतो.

**सर्व जाती-धर्म समावेशकत्वाचे काही दाखले -**

विठोबा भक्तीने प्रेरित होऊन विविध जातींतील लोकांनी आपल्या भक्तिसंप्रदायात सहभाग घेतला. गोरा कुंभार, सावतामाळी, नरहारी सोनार, चोखामेळा, आणि सेना न्हावी यांसारख्या संतांनी विविध व्यवसायांतील आपल्या अनुभवाचा आधार घेऊन अभंग रचले.काही उदाहरणे पुढीलप्रमाणे-

१.आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक

विवेक दर्पण आयना दाऊ । वैराग्य चिमटा हालऊ

उदक शांती डोई घोळू । अहंकाराची शेंडी पिळू

भावार्थाच्या बगला झाडू । काम क्रोध नखे काढू

चौवर्णा देऊनी हात । सेना राहिला निवांत

(सेना न्हावी)

२. कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी
सांवता म्हणे केला मळा । विठ्ठल पायी गोविला गळा
(सांवता माळी)

३. शवाचे ध्यान धरूनि अंतरी । मृत्तिकेमाझारी नाचतसे
विठ्ठलाचे नाम स्मरे वेळोवेळ । नेत्री वाहे जळ सद्गदीत
कुलालाचे वंशी जन्मले शरीर । तो गोरा कुंभार हरिभक्त
(गोराकुंभार)

४. देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार
देह बागेसरी जाणे । अंतरात्मा नाम सोने
त्रिगुणाची करूनी मूस । आत ओतिला ब्रह्मरस
जीव शीव करूनी फुंकी । रात्रंदिवस ठोकाठोकी
विवेक हातवडा घेऊन । काम क्रोध केला चुर्ण
मनबुद्धिची कातरी । रामनाम सोने चोरी
ज्ञान ताजवा घेउन हाती। दोन्ही अक्षरे जोखिती
खांद्या वाहोनी पोतडी । उतरला पैलथडी
नरहरी सोनार हरीचा दास । भजन करी रात्रंदिवस
(नरहरी सोनार)

**वारकरी संप्रदायाचा स्वीकार करण्याची प्रक्रिया -**

वारकरी संप्रदायाची दीक्षा घेणे अत्यंत साध्या पद्धतीने पार पडते. संप्रदायात विविध फड (प्रत्येक महंत किंवा साधूच्या शिष्यसमूह) अस्तित्वात असतात. दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्याला एका फडप्रमुखाकडून तुळशीच्या १०८ मण्यांची माळ घालून घ्यावी लागते. दीक्षेची प्रक्रिया अशी असते: दीक्षा घेणाऱ्याला माळ घेऊन फडप्रमुखाकडे किंवा साधूकडे जावे लागते. फडप्रमुख त्या मण्यांची माळ ज्ञानेश्वरीवर ठेवतात आणि दीक्षा घेणाऱ्याने प्रतिवर्षी पंढरपूरची वारी करण्याचे वचन घेतले जाते. हे वचन म्हणजे पंढरपूर आणि आळंदीच्या वारीचा किमान एक अनुभव आवश्यक आहे.

सहजपणे दिल्या जाणाऱ्या या दीक्षेत फडप्रमुख संप्रदायाच्या नियमांची आणि आचारधर्माची माहिती देतात. नियम पुढीलप्रमाणे आहेत: १. सत्य बोलावे. २. परस्त्रीला मातेसमान मानावे. ३. कांदालसूण आणि मांसाहार टाळावा. ४. मद्यपान वर्ज्य करावे. ५. रोज हरिपाठ करावा आणि 'रामकृष्णहरी' मंत्राचा जप करावा. ६. जीवनातील सर्व कर्मे श्रीविठ्ठलस्मरण करत पार पाडावी. हे सर्व नियम पाळण्याची तयारी दर्शवून, भक्त ज्ञानेश्वरीवर ठेवलेली तुळशीच्या मण्यांची माळ उचलतो आणि 'पुंडलीक वरदा हरिविठ्ठल' ह्या गजरात गळ्यात घालतो.

**ब. पंढरीची वारी**

पंढरीची वारी पायीच करण्याची परंपरा पूर्वी खूप मोठ्या प्रमाणावर पाळली जात होती, आणि आजही अनेक वारकरी हा प्रघात कायम ठेवतात. तथापि, वाहनांच्या सोयीमुळे आता अनेक लोक मोटारी किंवा रेल्वेने पंढरपूरला जातात. पंढरपूरच्या वाटेवर विविध ठिकाणांहून येणारे वारकरी एकमेकांना भेटू शकतात.

प्रत्येक वर्षी लाखो वारकरी पंढरपूरमध्ये जमा होतात, तसेच पंथाची दीक्षा न घेतलेले विठोभाचे भक्तही मोठ्या संख्येने येतात. पंढरपूरमध्ये आल्यावर, सर्व वारकरी प्रथम चंद्रभागेत स्नान करतात आणि त्यानंतर श्रीपांडुरंग आणि पुंडलिक यांचे दर्शन घेतात. पांडुरंगाचे दर्शन घेण्यापूर्वी पुंडलिकाचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. या दर्शनानंतर गावप्रदक्षिणा केली जाते आणि उरलेला वेळ भजन आणि कीर्तनात जातो.

पंढरपूरच्या तीर्थांमध्ये एक विशेषता म्हणजे इथे तीर्थोपवास, श्राद्ध, आणि मुंडणाचे विधी पारंपरिकरित्या केले जात नाहीत. आषाढी आणि कार्तिकीच्या आदल्या दिवसापासून, म्हणजे शुद्ध दशमीपासून, प्रत्येक फडावर भजन-कीर्तनाचे कार्यक्रम सुरू होतात. रात्री हरिजागर हा कार्यक्रम असतो. प्रत्येक वारकरी आपापल्या फडावर कीर्तनासाठी जात असला तरी इतर फडांवरील भजन आणि कीर्तन ऐकण्यासाठी सर्वांसाठी खुले असते. दशमीपासून चतुर्दशीपर्यंत या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.पंढरपूर जवळच्या गोपाळपूर गावातील गोपाळकृष्णाला काला दिला जातो. काल्याच्या लाह्या वारकरी परस्परांच्या मुखांत घालतात आणि त्यानंतर वारीची सांगता होते. घरी गेल्यावर कानवल्यांचे (मुरडीव) भोजन करतात. इतके झाले म्हणजे यात्रा संपते.

**संप्रदायाची लोकप्रियता-**

या संप्रदायाला अमाप लोकप्रियता मिळाली , त्याची काही पायाभूत करणे आहेत. जसे ह्यामध्ये उत्कट भक्ती, सदाचार, नीती ह्याना पाया मानणारा सरळ सोपा आचारधर्म सांगितला गेला आहे. कर्मकांडांना इथे थारा नाही. हि धारा सामाज्धारानेला पोषक आहे. यामध्ये कर्मावर भर आहे. ज्ञानयोगापेक्षा भात्कीयोगाला जास्त महत्व आहे. या पंथाने कधी राजाश्रयाची कास धरली नाही. लोकाभिमुखता हे वारकरी संप्रदायाचे एक फार मोठे वैशिष्टय होय.सामान्य माणूस हाच ह्या पंथाचा कायम आधार राहिला. लोकसंग्रह हे ह्या पंथाचे वैशिष्ट्य राहिले. प्रत्येक वारकरी आपापली कामे करूनच उदरनिर्वाह करीत असल्यामुळे भिक्षावृत्तीला ह्या पंथात थारा नाही. ह्या पंथाने तत्त्वचर्चेकडे पाठ फिरवली नाही आणि अंधश्रद्धेवरही आघात केले. अज्ञानावर आधारलेल्या उपासनेचा त्यांनी निषेध केला. वारकरी पंथाने देशी भाषेला जे महत्त्व दिले

वारकरी संप्रदाय सामाजिक समता आणि धार्मिक एकात्मतेच्या दृष्टीने एक आदर्श संप्रदाय म्हणून मानला जातो. वारकरी संप्रदायात अनेक प्रमुख भक्तांनी आपल्या जीवनात आणि त्यांच्या भक्ति काव्यांद्वारे संप्रदायाला मोठा प्रभाव दिला आहे.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -४

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. वारकरी ह्या शब्दाचा अर्थ काय?

२. वारकरी वारीसाठी कधी जातात?

३. वारकरी संप्रदायाचे पर्यायी नाव काय?

४. वारकरी संप्रदायाचे प्रमुख ग्रंथ कोणते?

५. वारकरी संतांची नावे लिहा.

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -१**

**खालील विधाने चूक किंवा बरोबर ते पुढे दिलेल्या कंसात लिहा.**

१. चूक
२. बरोबर
३. बरोबर
४. चूक.
५. बरोबर
६. चूक
७. बरोबर
८. बरोबर
९. चूक

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -२**

रिकाम्या जागा भरा.

१.४ वेद २. विद ३. अर्थ, मोक्ष ४. ऋचारूपी
५. गायन ६. कृषी

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

रिकाम्या जागा भरा.

१. ‘प्राचीन’

२ गौतम ऋषी

३. तर्काच्या साहाय्याने मोक्ष प्राप्त करणे

४. अणुवर

५. सुंदर वाक्ये किंवा ज्ञानपूर्ण वचन.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -४**

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. वारी करणारा

२. वारकरी संप्रदायाच्या अनुयायांनी प्रत्येक वर्षी आषाढ शुद्ध एकादशी आणि कार्तिक शुद्ध एकादशीच्या दिवशी

३. 'माळकरी संप्रदाय'

४. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, आणि तुकारामांची अभंगगाथा हे वारकरी संप्रदायाचे प्रमुख ग्रंथ आहेत.

५. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, कान्होपात्रा, गोरा कुंभार, सावतामाळी, नरहारी सोनार, चोखामेळा, आणि सेना न्हावी इत्यादी